अल्लाहची कृपा सर्वांसाठी

लेखक

मुहम्मद अफजल अहमद

अनुवाद

शाहजहान मगदुम

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

इस्लाम धर्म

सर्व स्तुती फक्त संपूर्ण सृष्टीच्या पालनकर्ता अल्लाहसाठीच आहे आणि त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर कृपा व कृतज्ञता असो. 'इस्लाम' या शब्दाचा पारिभाषिक अर्थ आहे, 'अल्लाहच्या प्रति संपूर्ण आत्मसमर्पण आणि आज्ञापालन'. अल्लाह संपूर्ण विश्वाचा व आकाशांचा स्रष्टा आहे. तो आपल्या आज्ञाधारक दासांचे रक्षण करतो आणि त्यांना सर्व प्रकारच्या संकटातून वाचवितो.

असीम कृपा, अनुपम वरदान आणि सर्वोच्च दयाळूतेने ओतप्रोत असलेला धर्म 'इस्लाम' ही अल्लाहकडून मानवजातील सर्वांत मोठी भेट आहे. इस्लाम एक संपूर्ण जीवनव्यवस्था आणि खरे मार्गदर्शन आहे. तो मनुष्यांना योग्य, सत्य आणि स्वाभाविक आस्था, सिद्धान्त, संकल्पना, नियम व संहिताकडे येण्याचे तसेच मानवी स्वभावाशी पूर्णतः अनुकूल असलेले लोक-परलोक सुशोभित करण्यासाठी त्यांचे अनुकरण करण्याचे आवाहन करतो आणि त्यासाठी त्यांना प्रेरितही करतो. हाच सृष्टीच्या आरंभीच मानवजातीकरिता अवतरित करण्यात आलेला एकमेव स्थायी व शाश्वत जीवनमार्ग आहे.

जगात जीवन व्यतीत करण्याकरिता मनुष्याला योग्य, सत्य आणि स्वाभाविक मार्गदर्शनाची आवश्यकता होती. आदम (अ.) मानवजातीचे पिता व पृथ्वीवरील प्रथम पुरुषाबरोबरच इस्लामचे प्रथम अनुयायीदेखील होते. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात इस्लामचे अनुसरण केले आणि आपल्या अपत्यांना इस्लामचा मार्ग अवलंबण्याचा तसेच त्यानुसार जीवन व्यतीत करण्याचा आदेश दिला. आदम (अ.) यांच्या काळापासूनच इस्लामचा स्वीकार करण्याचे आणि त्यानुसार जीवन व्यतीत करण्याचे आदेश व उपदेश सर्व राष्ट्रे व जातींच्या लोकांना अल्लाहकडून पाठविण्यात आलेल्या ईशदूतांद्वारा देण्यात येत होते; परंतु दुर्दैव असे की, ईशदूत व पैगंबरांद्वारा देण्यात आलेले संदेश व दाखविण्यात आलेले सत्यमार्ग आणि उचित जीवनव्यवस्था इस्लामपासून लोकांना दूर घेऊन जाण्याचा, भ्रमित करण्याचा आणि मार्गभ्रष्ट करण्याचा प्रयत्न स्वार्थी लोकांकडून निरंतर होत राहिला. अशा प्रकारे लोकांनी अल्लाहच्या आदेशांचे उल्लंघन करून सैतान व सैतानासारख्या लोकांचे ऐकले; त्यांचे रीतीरिवाज, धर्म व धार्मिक परंपरांचा अवलंब केला, त्यांचे अनुसरण केले, अनुचित पाप आणि कर्मांमध्ये गुरफटत गेले आणि अल्लाह त्यांना सत्यमार्ग दाखविण्यासाठी, त्यांचा उद्धार व विकासासाठी वेळोवेळी, निरंतर, एकापाठोपाठ एक पैगंबर व ईशदूत पाठवत होता. प्रत्येक ईशदूताने इस्लाम, त्याची जीवनव्यवस्था, शिकवणी, नियम आणि कर्तव्यांना व्यावहारिक रूप प्रदान केले व एका आदर्श इस्लामी समाजाची स्थापना केली. कारण सत्याचा शोध घेणाऱ्या आणि त्यानुसार आचरण करणाऱ्या सद्गृहस्थांना सत्यमार्ग लाभावा आणि त्यानुसार जीवन व्यतीत करून लोक व परलोकात यश लाभावे.

कालांतराने भौतिक पदार्थांच्या विकासाकडे जसजसा लोकांचा कल वाढला, तसतसा इस्लामबाबत ज्ञान प्राप्त करणे, त्याचे मार्गदर्शन समजून घेऊन ते सुरक्षित

करण्याच्या प्रक्रियेचादेखील विकास होत राहिला आणि हे कार्य एकसारखे दृढ होत गेले. त्याचबरोबर धर्म, ज्ञान, विज्ञान इत्यादींविषयीची माहिती अधिकांश देशांपर्यंत आणि लोकसमूहांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रसारमाध्यमे आणि साधनांचा विकास झाला व त्यात सुलभताही निर्माण झाली. ऐतिहासिक दृष्टीने सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या दूतांना वेळोवेळी, कधीकधी कालांतराने पाठवित राहिला. काहींचा अपवाद वगळता एकाच कालखंडात एक ईशदूत एक किंवा अधिक देश व लोकसमूहांकरिता मार्गदर्शन करीत असे. या शृंखलेच्या सर्वांत शेवटी अल्लाहने अंतिम प्रलयाच्या दिवसापर्यंत आपले अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांना संपूर्ण विश्वाकरिता इस्लामच्या शुद्ध व पूर्ण रूपासह पाठविले, ही ईशधर्माची शेवटची व सर्वांगीण आवृत्ती आहे. म्हणूनच सर्व देशांच्या नागरिकांनी व सर्व समूहांच्या लोकांनी कोणत्याही परिस्थितीत इस्लामचा स्वीकार करणे आणि आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात त्याचा अवलंब करणे, तसेच आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या संदेशाचेही अनुसरण करणे अनिवार्य आहे.

इस्लाम याच एकमेव साधनाद्वारे मानवांना अल्लाहच्या सत्य संदेशांची व मार्गदर्शनाची ओळख करून देण्यात येत असे आणि त्यांचा लाभ त्यांना मिळवून दिला जात असे. तसेच त्यांच्यादरम्यान संदेश व मार्गदर्शनाचा प्रचार-प्रसार होत असे. इस्लाम स्वीकारण्यात अपयशी ठरल्यानंतर कोणतीही व्यक्ती किंवा समाज कधीही व कुठेही अल्लाहचा सत्य संदेश, खरे ज्ञान आणि मार्गदर्शन मिळवू शकत नाही.

इस्लाम व मुस्लिमांच्या बाबतीत भ्रम व मिथ्या धारणा लोकांमध्ये आढळून येतात. जे योगायोगाने मुस्लिम कुटुंबात जन्म घेतात त्यांच्याचसाठी इस्लाम आहे, असे त्यांना वाटते. ते इस्लामला समजण्यासाठी कधीही पुढे सरसावत नाहीत, तसेच त्याचा स्वीकार करण्याची इच्छाशक्तीदेखील त्यांच्यात नसते. अशा समाजात आचरण व आस्था इस्लामच्या प्रतिकूलच नव्हे तर अगदी विवरीत असलेल्या तथाकथित मुस्लिमांची कमतरता नसते. त्यामुळे हेच लोक इस्लामला योग्य प्रकारे समजणे व समजावण्याच्या मार्गात मोठमोठ्या अडचणी, संकटे आणि अडथळे निर्माण करतात. अशा प्रकारच्या तथाकथित मुस्लिमांना पाहून विविध धर्माचरण करणाऱ्या लोकांना असे वाटते की इस्लामच त्यांना अशी अयोग्य कामे व पापकर्म करण्याची शिकवण देतो. मात्र सत्यता अशी आहे की केवळ मुस्लिम समुदायाशी संबंध आहे म्हणून कोणी व्यक्ती मुस्लिम होऊ शकत नाही. जो अल्लाहद्वारे पाठविण्यात आलेले सत्यसंदेश, त्याद्वारे दाखविण्यात आलेले सत्यमार्ग, धार्मिक कर्तव्ये आणि कार्यविधीनुसार चांगले व सत्कर्म करून त्यांचा प्रसार करतो आणि त्यानुसार आपले जीवन व्यतीत करतो तोच इस्लामचा खरा अनुयायी आहे. त्याच्या कथनी व करणीमध्ये कसलाही फरक नसतो. याविपरीत जी व्यक्ती वर उल्लेखित तथ्ये अमान्य करते व त्याबाबत सहमत नसते, त्यांच्या प्रतिकूल आचरण करते तिला लोक मुस्लिम मानत असले तरी ती अल्लाहच्या दृष्टीने मुस्लिम नाही, तर सत्य नाकारणारी, विधर्मी व अनेकेश्वरवादी आहे.

म्हणूनच अल्लाह इस्लामला आपल्या संपूर्ण जीवनात मन, वचन व कर्माने पूर्णत:

स्वीकार करण्याचे, प्रत्येक धर्माच्या अनुयायांना, ज्यात मुस्लिमांचाही समावेश आहे, आवाहन करतो. अशा लोकांच्या बाबतीत पवित्र कुरआनने स्पष्ट शब्दांत म्हटले आहे, 'जे इस्लामला पूर्णपणे स्वीकारत नाहीत, अल्लाहसमोर संपूर्ण निष्ठेने समर्पित होत नाहीत आणि स्वत:ला पूर्णत: अल्लाहच्या स्वाधीन करीत नाहीत, ते परलोकात अत्यंत शोकाकुल अवस्थेत असतील, तेथे त्यांना कठोर शिक्षा व भयंकर यातना भोगाव्या लागतील. निश्चितच अल्लाह, त्याचे पैगंबर, त्याचा धर्मग्रंथ, अंतिम निवाड्याच्या दिवसावर आणि प्रतिदानावर विश्वास ठेवणारे सत्कर्मी लोक तेथे आनंदीत असतील.'

''नि:संशय जे श्रद्धावंत (मुहम्मद (स.)) यांच्यावर श्रद्धा ठेवणारे आहेत, तसेच यहुदी, इसाई किंवा साबिईन आहेत जे जे कोणी अल्लाह व पारलौकिक जीवनावर श्रद्धा ठेवतील आणि सत्कर्मे करतील त्यांच्या पालनकर्त्यापाशी त्यांचा मोबदला आहे. त्यांना न कोणते भय असेल न ते कधी शोक करतील.'' (दिव्य कुरआन, २:६२)

इस्लाम एक विश्वव्यापी धर्म आहे. त्याचा संदेश आणि मार्गदर्शन संपूर्ण मानवजातीसाठी आहे. यात संप्रदाय, जात, वंश, गोत्र, प्रांत आणि देशाचा कसलाच भेदभाव नाही. इस्लामचा स्वीकार करून आणि त्यानुसार जीवन व्यतीत करून प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनास यशस्वी करू शकते. त्याचबरोबर या जगात केलेल्या सत्कर्मांमुळे ती आपल्या भावी अमर जीवनातदेखील यश संपादन करून स्वर्गात प्रवेश मिळवू शकते. स्वर्ग सर्व प्रकारच्या सुखसुविधांनी सुसज्ज आहे. जो याच्या विपरीत कर्म व आचरण करील तो निश्चितच नरकात जाईल आणि तेथील कठोर शिक्षा व भयंकर यातना त्यास भोगाव्या लागतील, निरंतर भोगाव्या लागतील, मरणारही नाही आणि जगणारही नाही. जी व्यक्ती या नाशवंत व अस्थायी जगात येते तिला पुढील शाश्वत व चिरस्थायी जगात जावेच लागते. या जगात स्वीकारण्यात आलेल्या धार्मिक आस्था, धर्मव्यवस्था आणि केलेल्या कर्मांनुसार तेथे ती व्यक्ती एकतर स्वर्गात जाईल अथवा तिला नरकातील धगधगत्या आगीत कायमचे ढकलून दिले जाईल. म्हणूनच कुरआनमध्ये लोकांना अशा शब्दांत सतर्क करण्यात आले आहे,

''लोकहो, उपासना (भक्ती) करा आपल्या पालनकर्त्याची ज्याने तुम्हाला आणि तुमच्या पूर्वजांनाही निर्माण केले. जेणेकरून तुम्ही (दुष्कर्मांपासून) परावृत्त राहू शकाल.''

(दिव्य कुरआन, २:२१)

अल्लाह आपल्या अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांना म्हणतो, तुम्ही लोकांना सांगा की, 'सर्व मानवांकरिता ईशदूत म्हणून मला अल्लाहने पाठविले आहे.'

''हे मुहम्मद (स.) सांगा की 'हे मानवांनो, मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा पैगंबर आहे जो पृथ्वी व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे, त्याच्याशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही, तोच जीवन प्रदान करतो व तोच मृत्यू देतो, म्हणून श्रद्धा ठेवा अल्लाहवर आणि त्याने पाठविलेल्या निरक्षर नबी (अ.) वर जो अल्लाह व त्याच्या आदेशांना मानतो. आणि अनुसरण करा त्याचे, जेणेकरून तुम्ही सरळमार्ग प्राप्त कराल.'' (दिव्य कुरआन, ७:१५८)

अल्लाह पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बाबतीत म्हणतो -

"हे पैगंबर (स.) आम्ही तर तुम्हाला जगवासीयांसाठी कृपा बनवून पाठविले आहे." (दिव्य कुरआन, २१:१०७)

अल्लाहचा पवित्र ग्रंथ कुरआन संपूर्ण मानवजातीसाठी पाठविण्यात आला आहे. कृपावंत आणि दयावंत अल्लाहकडून मानवजातीला हा ग्रंथ एक खरे मार्गदर्शन, कृपा आणि अनुपम भेट आहे.

"कुरआनचे अवतरण झाले मानवजातीकरिता मार्गदर्शन व मार्गदर्शनाच्या सुस्पष्ट पुराव्यांनी समाविष्ट सत्य व असत्याची कसोटी." (दिव्य कुरआन, २:१८५)

"आम्ही या कुरआनच्या अवतरणक्रमात ते काही उतरवित आहोत जे त्याच्या अनुयायांसाठी तर रोगानिवारक आणि कृपा आहे, परंतु अत्याचाऱ्यांकरिता हानीव्यतिरिक्त अन्य कोणत्याच गोष्टीत वाढ करीत नाही." (दिव्य कुरआन, १७:८२)

पुढील पानांवर अल्लाहच्या सर्वाधिक बहुमूल्य व सर्वोत्तम भेट इस्लामच्या मूळ शिकवणी व वैशिष्ट्यांना पूर्ण सद्भावनेसह मानवसमाजापुढे सादर केले जात आहे. इस्लाम दयाळूपणा, शांतता आणि मानवतेने ओतप्रोत ईशधर्म आहे आणि संपूर्ण मानवजातीकरिता पाठविला गेला आहे. अल्लाहपाशी अत्यंत विनम्र विनंती आहे की त्याने हे पुस्तक लोकांसाठी उपयोगी व लाभदायक बनवावे, तसेच या पुस्तकास त्यांच्याकरिता योग्य मार्गदर्शनाचे साधन व माध्यम बनवावे. (तथास्तु)

कलिमा

इस्लामी पारिभाषिक शब्दांमध्ये 'कलिमा'चा अर्थ 'सत्याचा स्वीकार करणे आणि त्यास आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात आत्मसात करणे' असा आहे आणि हाच मानवी जीवनाचा मुख्य उद्देश आहे.

अशा प्रकारे मानवी जीवनात 'कलिमा'च्या केवळ दोनच पैलूंना कृतकृत्य करणे शक्य आहे. याचा एक पैलू सत्य व सुनिश्चित तथ्यावर आधारित आहे. त्यास 'कलिमा तैयिबा' म्हटले जाते. दुसरा पैलू म्हणजे 'कलिमा तैयिबा'द्वारा निर्धारित सीमेचे उल्लंघन करणे होय, त्यास 'कलिमा खबीसा' या नावाने ओळखले जाते.

'कलिमा तैयिबा' शुद्ध धार्मिक व आस्थामोहक सत्याचे द्योतक आहे. यात सत्य स्वीकारणे आणि त्यास पूर्णत: आत्मसात करण्याचा भाव आहे. अल्लाहचे अद्वितीयत्व आणि एकमेवत्वावर आस्था ठेवणे, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वावर विश्वास ठेवण्याची भावना आहे. त्याचबरोबर परलोकावर विश्वास ठेवणे, एक दिवस महाप्रलय अवश्य घडणार आहे आणि अंतिम निवाड्याचा दिवस निश्चित येणार आहे, त्या दिवशी जगातील प्रथम पुरुषापासून अंतिम मनुष्यापर्यंत, जे या भौतिक जगाच्या निर्माणकाळापासून विनाशकाळापर्यंत (महाप्रलय दिवस) जन्माला आले असतील अशा सर्वांना एकत्रित केले जाईल. त्या दिवशी परलोकात व्यक्तीच्या बऱ्या-वाईट कर्मांचा हिशोब घेतला जाईल आणि प्रत्येकास या भौतिक जगात केलेल्या कर्मांच्या आधारावर शिक्षा किंवा मोबदला दिला जाईल. 'कलिमा तैयिबा' एक असा ईशमहामंत्र, सत्य धर्मसिद्धान्त आणि आस्थामोहक शाश्वत विचारधारा आहे, ज्याद्वारे संपूर्ण ब्रह्मांडाच्या व्यवस्था संचलित व

नियंत्रित होतात. ही विचारधारा मानवी स्वभावाशी पूर्णतः अनुकूल आहे आणि मानवी स्वभाव त्याद्वारे नियंत्रित होतो. म्हणून एखादी व्यक्ती मौखिक स्वरुपात या 'कलिमा'चा स्वीकार करते, त्यावर शुद्ध मनाने आस्था व्यक्त करते आणि आपले जीवन व चरित्रात व्यावहारिक स्वरूपात याचे प्रदर्शन करते तेव्हा ती व्यक्ती एक सभ्य, शिष्ट, सज्जन, सदाचारी, धर्मपरायण, संयमी आणि मानवहितकारक व्यक्तित्वाचे रूप धारण करते. ती प्रामाणिक बनते आणि योग्य व कल्याणकारी निर्णय घेते. ती आपल्या समाजाकरिता चरित्र व आचारविचाराच्या दृष्टीने एका आदर्श व्यक्तीच्या स्वरुपात नावारूपास येते. तो मनुष्य मिथ्या धारणा, विनाशकारी विचार भोगविलास, अश्लीलता, निर्लज्जता, व्यभिचार, भ्रष्टाचार, दुराचरण, कपट इत्यादीपासून स्वतःला पूर्णतः अलिप्त ठेवतो. अल्लाह अशा व्यक्तीला सुधारण्याची संधी देत असतो आणि तिचे चरित्र समाजासमोर स्वच्छता, प्रामाणिकता, पावित्र्य, सदाचार, शिष्टाचार, नैतिकता, दयाळूपणा, न्यायप्रियता, सहकार्य, विश्वसनीयता, विश्वासपात्रता, सज्जनपणा आणि सहानुभूतीचे बोलके उदाहरण आणि आदर्श बनते. त्यामुळे ती व्यक्ती सर्वांत मोठे व सर्वोत्तम यश प्राप्त करते.

संक्षिप्तमध्ये सांगावयाचे झाल्यास मानवता आपल्या इच्छित व सर्वोत्तम स्वरूपात विकसित होते.

'कलिमा तैयिबा' मानवी जीवनाच्या आरंभापासूनच या जगात अस्तित्त्वात आहे. आदम (अ.) व हव्वा यांच्याबरोबरच त्याचे अवतरण झाले आणि ते महाप्रलय काळापर्यंत या जगात राहील आणि परलोकात तर ते निरंतर राहील. यात कोणत्याही प्रकारच्या दुरुस्तीची, सुधारणेची, कमी किंवा जास्त करण्याची आणि रद्द करण्याची आवश्यकता आहे असे म्हणण्याची अजिबात गरज नाही.

या विपरीत 'कलिमा खबीसा' मिथ्या व अपरिपक्व धारणा, भ्रामक सिद्धान्त व अइच्छित विचारधारांवर आधारित जीवनप्रणालीची स्थापना करतो. त्यामुळे मानवी समाजात नास्तिकता, अनीश्वरत्व, अनेकेश्वरत्व, ईशनिंदादायक प्रणाली, भौतिकवाद, कपट, सांप्रदायिक घृणा व द्वेष आणि अवज्ञाकारीपणाचा कळस गाठला जातो. 'कलिमा खबीसा' लोकांना नीचकर्म, पापकर्म, दुराचरण, निंदाजनक व्यवहार करणे आणि दुश्चरित्रता आत्मसात करण्यास प्रेरित करतो. त्यामुळे अन्याय, अत्याचार, अनैतिकता, अपहरण, क्रूरता, उपद्रव, शोषण, भ्रष्टाचार, व्यभिचार, घोटाळा, हत्या यासारख्या दानवी दुष्कर्मांनी समाज भरून जातो. त्यामुळे मानवसमाज दुष्टता, द्वेषभाव, चरित्रहीनता, दुराचार, अश्लीलता, कपटाचार इत्यादींना बळी पडतो आणि समाजात अत्यंत दयनीय, भयंकर, दुःखद, कष्टमय, संकटमय आणि भयानक परिस्थिती निर्माण होतात. सर्वत्र 'त्राहिमाम्, त्राहिमाम्' (वाचवा, वाचवा) असा कारुण्यमय व हृदयद्रावक स्वर ऐकू येऊ लागतो.

वर उल्लेखित प्रमुख अवगुण सत्य व धर्मपरायणतेच्या विरुद्ध आणि पूर्णपणे विपरीत आहेत. ईशनियम आणि आदेशदेखील 'कलिमा खबीसा'बाबत अत्यंत कठोर व त्याच्या पूर्णतः विरुद्ध आहेत, अर्थात ते कणभरसुद्धा त्याच्या बरोबर नाहीत. जेव्हा जेव्हा 'कलिमा

खबीसा' आपल्या विविध रूपांमध्ये अस्तित्वात आला तेव्हा त्यास पूर्णत: ठेचून नष्ट करण्यात आले, हे ऐतिहासिक सत्य आहे. या कलिमामध्ये ना दृढता आहे ना स्थायित्त्व आणि त्यात चिरस्थायी असल्याचा गुणदेखील नाही. दुर्दैव असे की अधिकांश लोक अल्लाहच्या चेतावणीकडे लक्ष देत नाहीत, त्याच्या आदेशांचे पालन करीत नाहीत आणि सत्य व धर्मपरायणतेशी स्वत:ला जोडत नाहीत, तर ते आपापल्या 'कलिमा खबीसा'ची रचना करतात आणि त्यास चिकटून राहतात, ज्यामुळे समाजातील बहुतांश लोक त्यांच्या वाईट प्रभावामुळे आपले लोक-परलोक बिघडवून घेतात. त्यामुळे त्यांना भावी जीवनात (परलोकात) अपयश, नुकसान, निराशा आणि मूर्खपणाशी सामना करावा लागेल. अल्लाहची अप्रसन्नता, त्याचा क्रोध, भयंकर यातना आणि कठोर शिक्षेच्या आगीत जळावे लागेल. 'कलिमा खबीसा'चे अनुसरण करणाऱ्या आणि त्यावर आस्था बाळगणाऱ्या लोकांना नरकाच्या आगीत लोटण्यात येईल आणि ते त्यात कायमचे जळत राहतील.

''तुम्ही पाहत नाही काय की अल्लाहने 'पवित्र वचनाला' कशाची उपमा दिली आहे? त्याची उपमा अशी आहे जणू एका चांगल्या जातीचा वृक्ष ज्याचे मूळ जमिनीत खोलवर रुजले आहे आणि फांद्या आकाशाला भिडल्या आहेत, प्रत्येक क्षणी ते आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेने फळे देत आहे. ही उदाहरणे अल्लाह याकरिता देत आहे की लोकांनी यापासून बोध घ्यावा आणि दुर्वचनाची उपमा एका हलक्या प्रतीच्या झाडासारखी आहे जे जमिनीच्या पृष्ठावरून उपटून फेकले जाते. त्यांच्यासाठी कसलीच दृढता नाही. श्रद्धावंतांना अल्लाह एका दृढ वचनाच्या आधारावर इहलोक व परलोक दोहोंमध्ये स्थैर्य प्रदान करतो आणि अत्याचाऱ्यांना अल्लाह पथभ्रष्ट करतो, अल्लाहला अधिकार आहे जे हवे ते करतो.''

(दिव्य कुरआन, १४:२४-२७)

कलिमा शहादत

सत्याचा स्वीकार करणे, त्यावर शुद्ध मनाने आस्था व्यक्त करणे आणि त्यास अनुकूल यथोचित कर्म करणे, तसेच 'कलिमा तैयिबा'ला पूर्णत: समजून घेऊन स्वेच्छा व स्वाभाविक आणि शुद्ध निष्ठेने 'कलिमा शहादत' (खऱ्या व दृढ धार्मिक सिद्धान्ताची साक्ष) च्या घोषणा व अभिव्यक्तीची बारी येते. यात 'अल्लाहव्यतिरिक्त इतर कोणीही उपास्य नाही आणि आदरणीय मुहम्मद (स.) अल्लाहचे दास व पैगंबर आहेत' याबाबत स्पष्ट घोषणा आहे. 'कलिमा शहादत' असा आहे,

''अल्लाहव्यतिरिक्त कोणी पूज्य-उपास्य नाही, त्याचा कोणी सहकारी अथवा सहभागी नाही याची मी साक्ष देतो. तसेच पैगंबर मुहम्मद (स.) त्याचे दास व पैगंबर आहेत याची मी साक्ष देतो.''

अशा प्रकारे 'कलिमा शहादत'वर पूर्णत: आस्था व्यक्त करणे आणि शुद्ध मनाने त्यास आत्मसात केल्यानंतर मनुष्य इस्लाममध्ये प्रवेश करतो आणि तो अल्लाहच्या पक्षाशी सलग्न होतो. त्यास अल्लाहची प्रसन्नता प्राप्त होते. तो लोक व परलोक दोन्ही ठिकाणी अल्लाहच्या मोबदला, भेट, वरदान, अनुग्रह आणि कृपेस पात्र ठरतो. त्यामुळे त्यास पारलौकिक जीवनात चिरस्थायी, शाश्वत, मनोरम आणि सर्व प्रकारच्या आनंदानी

ओतप्रोत स्वर्ग प्रदान केला जाईल.

'कलिमा शहादत' एखाद्या जादूचे शब्द अथवा जादूटोना नाही की ज्यामुळे ते उच्चारताच लोकांमध्ये वर उल्लेखित सर्व गुण आणि विशेषता आपोआप प्रकट होतील, त्यांचे आचरण व कर्मात पूर्णत: परिवर्तन होईल. हा सर्वशक्तिमान अल्लाहद्वारे संपूर्ण मानवजातीच्या उद्धारासाठी पाठविण्यात आलेला एक महामंत्र आहे. यावर खरी आस्था प्रकट करून आणि त्यानुसार जीवन व्यतीत करून एखादी व्यक्ती मग तिचा संबंध कोणत्याही परिवार, वंश, गोत्र, संप्रदाय, जात, देश अथवा कालखंडशी का असेना, खरा व चांगला मनुष्य बनते आणि यावर आधारित धार्मिक कर्तव्ये पूर्ण करूनच तो मनुष्य स्वत:ला एका आदर्श मनुष्याच्या रूपात सादर करतो. त्याच्या मन व वचन, आचरण व कर्माने 'कलिमा शहादत'ला संपूर्ण आस्थेसह आत्मसात करण्याने आणि आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रास त्याच्या साच्यात बसविल्याने सत्याची अभिव्यक्ती होते.

''अल्लाहशिवाय कोणीही उपास्य नाही, त्याचा कोणी भागीदार नाही, याची मी साक्ष देतो.''

सर्व प्रकारच्या 'उपास्यां'चा (पूज्य, प्रभू, देवी-देवता इत्यादीचा) पूर्णपणे इन्कार करणे, निषेध, खंडन व त्याग करणे आणि एक आणि फक्त एकमेव उपास्य असलेल्या 'अल्लाह'ची साक्ष देणे हा 'कलिमा शहादत'चा केंद्रीय भाव आहे.

सर्वशक्तिमान व विश्वव्यापी अस्तित्व आहे आणि तो या संपूर्ण ब्रह्मांडांचा स्रष्टा, पालनहार, प्रभु, स्वामी, सर्वोच्चाधिकारी, शासक, नियामक, संचालक, नियंत्रक इत्यादी आहे, हे 'इलाह' (उपास्य) शब्दाच्या सांगण्यात आलेल्या अर्थाचे आणि उल्लेख करण्यात आलेल्या वैशिष्ट्यांचे तात्पर्य आहे. परंतु काही स्वार्थी लोकांद्वारा कृत्रिम 'इलाह'ना (उपास्यांना) या वैशिष्ट्यांनी विभूषित करण्यात आल्यामुळेच अल्लाहव्यतिरिक्त त्यांची पूजा व उपासना केली जाते आणि त्यांच्या आदेशांचे पालन केले जाते. थोडक्यात अल्लाहचा एक अथवा एकापेक्षा अनेक गुण ज्या अस्तित्वात आढळून येतात त्यास कृत्रिम किंवा बनावटी 'इलाह' (उपास्य) मानले जाते.

वास्तविकपणे कृत्रिम व बनावटी 'इलाह' (उपास्य) मध्ये अगणित भेद असूनदेखील 'अल्लाह'शिवाय खराखुरा पूज्य प्रभू (ईश्वर) मानले जावे असे एकही अस्तित्व नाही. 'अल्लाह'च 'इलाह' आहे, खराखरा उपास्य, त्याच्याव्यतिरिक्त कोणीही पूज्य प्रभू (ईश्वर) नाही. त्यामुळे हेच सिद्ध होते की जगातील सर्व वस्तूंना अल्लाहनेच निर्माण केले आहे आणि फक्त त्याच्याचकडून त्यांचे पालनपोषण केले जात आहे. पवित्र कुरआन स्पष्ट शब्दांत सांगतो,

''अल्लाह तो चिरंतनजीवी आहे ज्याने तमाम सृष्टीचा भार सांभाळलेला आहे, त्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही. तो झोपतही नाही आणि त्याला झोपेची गुंगीही येत नाही. पृथ्वी आणि आकाशात जे काही आहे त्याचेच आहे. असा कोण आहे जो त्याच्या पुढे त्याच्या परवानगीशिवाय शिफारस करू शकेल? जे काही दासांच्या समक्ष आहे त्यालाही तो जाणतो आणि जे काही त्यांच्यापासून अदृश्य आहे त्यालाही तो जाणतो आणि

त्याच्या माहितीपैकी कोणतीही गोष्ट त्यांच्या बुद्धिकक्षेत येऊ शकत नाही. याव्यतिरिक्त की एखाद्या गोष्टीचे ज्ञान तो स्वतःच त्यांना देऊ इच्छित असेल. त्याचे राज्य आकाश आणि पृथ्वीवर पसरले आहे, आणि त्यांचे संरक्षण काही त्याला थकवून सोडणारे काम नव्हे. फक्त तोच एकटा महान व श्रेष्ठ आहे.'' (दिव्य कुरआन, २: २५५)

''तुमचा खरा ईश्वर फक्त एकच आहे, तो जो पृथ्वी आणि आकाशाचा आणि त्या सर्व वस्तूचा मालक आहे ज्या पृथ्वी आणि आकाशात आहेत, आणि सर्व दिशांचा मालक.'' (दिव्य कुरआन, ३७:४-५)

''तुमचा ईश्वर एकच आहे, त्या परम दयाळू व कृपाळू ईश्वराशिवाय अन्य कुणीही ईश्वर नाही.'' (दिव्य कुरआन, २:१६३)

''अल्लाहशिवाय अन्य कोणीही ईश्वर नाही आणि अस्तित्व केवळ अल्लाहचेच आहे ज्याची शक्ती सर्वांपेक्षा वरचढ आहे व ज्याची बुद्धिमत्ता विश्वव्यवस्थेत कार्यरत आहे.'' (दिव्य कुरआन, ३:६२)

''त्याच्याशिवाय (अल्लाहशिवाय) इतर कोणीही ईश्वर नाही, तोच जीवन देतो आणि तोच मृत्यू देतो.'' (दिव्य कुरआन, ७:१५८)

''म्हणून सर्वोच्च आहे अल्लाह, खरा बादशाह, कोणी ईश्वर त्याच्याशिवाय नाही. स्वामी आहे महान सिंहासनाचा.'' (दिव्य कुरआन, २३:११६)

''तोच एक अल्लाह आहे ज्याच्याशिवाय कोणी भक्तीला पात्र नाही. त्याच्याकरिता स्तुती आहे. इहलोकातही व परलोकातही शासन त्याचेच आहे आणि त्याच्याकडेच तुम्ही सर्व परतविले जाणार आहात.'' (दिव्य कुरआन, २८:७०)

''तो अल्लाहच आहे ज्याच्याव्यतिरिक्त कोणी उपास्य नाही. अदृश्य आणि दृश्य सर्व गोष्टींना जाणणारा तोच मेहरबान व दयावान आहे. तो अल्लाहच आहे ज्याच्याव्यतिरिक्त कोणी उपास्य नाही. तो बादशाह आहे अत्यंत पवित्र, सर्वस्वी, शांती, अभयदान देणारा, सर्वांवर लक्ष ठेवणारा, सर्वांवर प्रभावी, आपली आज्ञा बळाने लागू करणारा आणि मोठाच बनून राहणारा, पवित्र आहे अल्लाह त्या अनेकेश्वरवाद्यांपासून जे हे लोक करीत आहेत. तो अल्लाहच आहे जो निर्मितीची योजना आखणारा आणि ती अमलात आणणारा आणि त्यानुसार रंगरुप देणारा आहे. त्याच्यासाठी सर्वोत्तम नावे आहेत. प्रत्येक वस्तू जी आकाशात व पृथ्वीत आहे त्याचे पावित्र्यगान करीत आहे आणि तो जबरदस्त व बुद्धिमान आहे.'' (दिव्य कुरआन, ५९:२२-२४)

''अल्लाहव्यतिरिक्त कोणीही उपास्य नाही. जो एकमेव आहे सर्वांवर प्रभुत्वसंपन्न, आकाशांचा आणि पृथ्वीचा स्वामी आणि त्या सर्व वस्तूंचा स्वामी ज्या त्यांच्यादरम्यान आहेत. महान आणि क्षमाशील.'' (दिव्य कुरआन)

अल्लाहशिवाय कोणीही 'उपास्य' नाही हे पवित्र कुरआनच्या वरील आयतीवरून स्पष्ट होते. फक्त अल्लाहच निरंतर राहणारा, विश्वव्यापी ईश्वर आहे, सर्व वस्तूंचा स्रष्टा आणि आपल्या सर्व सृष्टींच्या सर्व गरजा पूर्ण करणारा व पालनकर्ता तोच आहे. संपूर्ण ब्रह्मांडास संचालित व नियंत्रित करणारा हाच तो अल्लाह आहे. तो प्रत्येक वस्तूचा ईश्वर,

स्वामी, पालनकर्ता आणि संरक्षक आहे. तो सर्वज्ञ, प्रभुत्वशाली आणि सर्वशक्तिमान आहे. तो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा सर्व वस्तूंना जाणतो. तो अत्यंत कृपावंत व दयावंत आहे.

हाच तो सर्व शक्ती व अधिकारांचा स्वामी व मालक आहे. तोच जीवन व मृत्यू देतो. तो पवित्र, प्रभुत्वशाली, विश्वव्यापी व सर्वशक्तिमान आहे आणि सर्व शक्ती व अधिकारसंपन्न आहे. तोच शांतता व संरक्षण देतो. त्याच्याव्यतिरिक्त कोणातही अशा प्रकारचे गुण अथवा वैशिष्ट्ये आढळत नाहीत. म्हणूनच कोणीही अल्लाहसारखा असू शकत नाही. कारण सर्व वस्तू अल्लाहद्वारा बनविण्यात आल्या आहेत. सृष्टी असल्याकारणाने सर्व वस्तू अल्लाहच्या दास आहेत आणि त्या आपली उपजीविका मिळविण्यासाठी तसेच गरजांच्या पूर्ततेसाठी अल्लाहच्या कृपेवर अवलंबून असतात. त्यामुळे सृष्टीस 'उपास्य' मानणे किंवा अल्लाहसमान मानणे उचित नाही. म्हणूनच ईश्वराची सृष्टी ईशगुणांनी संपन्न असणे कसे शक्य आहे?

कुरआननुसार,

''स्तुती त्या अल्लाहसाठी आहे जो आकाश आणि पृथ्वीतील प्रत्येक वस्तूंचा मालक आहे आणि पारलौकिक जीवनामध्येही त्याच्यासाठीच स्तुती आहे. तो बुद्धिमान आणि माहितगार आहे. जे काही जमिनीत जाते आणि जे काही तिच्यातून निघते आणि जे काही आकाशातून उतरले आणि जे काही त्याच्यात चढते, प्रत्येक वस्तूला तो जाणते, तो परम कृपाळू आणि क्षमाशील आहे.'' (दिव्य कुरआन, ३४:१-२)

त्यामुळे प्रत्येकाने अल्लाहचे एकमेवत्व मान्य करण्याची त्यास फक्त एक व एकच मानण्याची आणि त्याच्याकडे सर्व प्रकारच्या गरजांची पूर्तता करणाऱ्या वस्तूंची व उपजीविका किंवा रोजगाराच्या सामानाची मागणी करण्याची आवश्यकता आहे.

''वस्तुस्थिती अशी आहे की, अल्लाह लोकांवर मोठी मेहेरबानी करणारा आहे, परंतु बहुतेक लोक कृतज्ञता मानीत नाहीत. तोच अल्लाह (ज्याने तुमच्यासाठी हे सर्वकाही केले आहे) तुमचा पालनकर्ता आहे. प्रत्येक वस्तूचा निर्माता त्याच्याव्यतिरिक्त कोणीही उपास्य नाही.'' (दिव्य कुरआन, ४०:६१-६२)

''तो अल्लाहच तर आहे ज्याने तुमच्यासाठी पृथ्वीला निवासस्थान बनविले आणि या आकाशाचे घुमट बनविले. ज्याने तुमचे रूप बनविले आणि फारच चांगले बनविले. ज्याने तुम्हाला शुद्ध वस्तूंची उपजीविका दिली. तोच अल्लाह (ज्याची ही कामे आहेत) तुमचा पालनकर्ता आहे, अतिशय समृद्धशाली आहे तो सृष्टीचा पालनकर्ता, तोच जिवंत आहे, त्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही. त्याचाच तुम्ही धावा करा, आपल्या धर्माला त्याच्यासाठीच विशुद्ध राखून. सर्व स्तुती सकल जगांचा पालनकर्ता अल्लाहसाठीच आहे.'' (कुरआन ४० : ६४-६५)

''हा आहे तुमचा पालनकर्ता अल्लाह, कोणीही ईश्वर त्याच्याव्यतिरिक्त नाही, प्रत्येक वस्तूचा निर्माता. म्हणून तुम्ही त्याचीच भक्ती करा आणि तो प्रत्येक वस्तूचा रक्षणकर्ता आहे.'' (दिव्य कुरआन, ६:१०२)

''लोकहो, तुम्हावर अल्लाहचे जे उपकार आहेत त्यांची आठवण ठेवा, अल्लाहशिवाय एखादा अन्य निर्माता आहे काय जो तुम्हाला आकाश आणि पृथ्वीतून उपजीविका देत असेल? कोणी उपास्य त्याच्याखेरीज नाही.'' (दिव्य कुरआन, ३५:३)

''आणि अल्लाहसह कोणत्याही अन्य उपास्याचा धावा करू नका. त्याच्याशिवाय दुसरा कोणी उपास्य नाही. प्रत्येक वस्तू नश्वर आहे केवळ त्या अस्तित्वाखेरीज सत्ताधिकार त्याचाच आहे आणि त्याच्याकडेच तुम्ही सर्व परताविले जाणार आहात.''

(दिव्य कुरआन, २८:८८)

''फार उच्च व श्रेष्ठतर आहे तो ज्याच्या ताब्यात पृथ्वी व आकाशाचे आणि त्या प्रत्येक वस्तूचे राज्य आहे जे पृथ्वी व आकाशांच्या दरम्यान आढळते आणि तोच पुनरुत्थानाच्या घटकेचे ज्ञान ठेवतो आणि त्याच्याकडे तुम्ही सर्व परतविले जाणार आहात.'' (दिव्य कुरआन, ४३:८५)

अल्लाहने आपल्या दासांना बरे व वाईट समजणे आणि त्यांच्यात फरक करण्याचे ज्ञान दिले आहे आणि त्यांना त्यांच्या संभावित परिणामांपासून सावध केले आहे. तो आपल्या दासांच्या सर्व व्यवहारांना व कामांना जाणतो. त्याने आपल्या आज्ञाधारक दासांसाठी चांगला मोबदला व बक्षीसाची व्यवस्था करून ठेवली आहे, तसेच आज्ञा न पाळणाऱ्यांना व बंडखोरांकरिता भयंकर यातना व कठोर शिक्षेची तरतूद केली आहे. वास्तविकत: जो कोणी वाईट कर्म व वाममार्ग सोडून सत्कार्य व सन्मार्गाचा अवलंब करील अल्लाह निश्चितच त्याचे पाप व कुकर्म माफ करील. खरोखरच अल्लाह आपल्या दासांसाठी मोठा कृपावंत व अत्यंत दयावंत आहे. तो सर्वव्यापी सर्वज्ञ, सर्वशक्तिमान आणि कठोर शिक्षा देणारा आहे,

''निश्तिच अल्लाह सर्वव्यापी व सर्वज्ञ आहे.'' (दिव्य कुरआन, २:११५)

''सावध व्हा, अल्लाह शिक्षा देण्यातसुद्धा कठोर आहे आणि त्याचबरोबर फार क्षमाशील व दयाळूदेखील आहे.'' (दिव्य कुरआन, ५:९८)

''विश्वास ठेवा की अल्लाह लोकांसाठी अत्यंत करुणावंत आणि कृपावंत आहे.''

(दिव्य कुरआन, २:१४३)

''आणि मुहम्मद (स.) त्याचे दास व पैगंबर आहेत याची मी साक्ष देतो.''

मानवसमाज स्वत: अथवा इतर माध्यमाद्वारे प्राप्त करू शकत नसलेला सत्यधर्म, सत्यमार्ग आणि सर्वांगीण जीवनव्यवस्थेचे आवश्यक ज्ञान व मार्गदर्शन देण्याचे सर्वोत्तम नियोजन अल्लाहने केले, हेदेखील कृपावंत व दयावंत अल्लाहचे एक उदार दान, सर्वोत्तम भेट, महान वरदान आणि त्याची असीम कृपा आहे.

सर्वशक्तिमान अल्लाहने आपली सर्वोत्तम कृती मानवास ज्ञान प्रदान करण्याची जी सोय केली आहे, त्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण असे की त्याने आदम (अ.) व हव्वा यांना त्यांच्या संततीला मार्गदर्शन करण्याचे वचन दिले होते. दुसरे असे की कोणतीही व्यक्ती मानवी जीवनाच्या बाबतीत योग्य व सर्वांगीण विचारधारा, सिद्धान्त व जीवनव्यवस्था निर्मित व सादर करु शकत नाही, कारण एखाद्या वस्तूबाबत पूर्ण माहिती

सादर करणे कोणत्याही मानवास अवघडच नव्हे तर अशक्य आहे. ही वास्तवता असताना काही अदूरदर्शी, वेडसर व दुराग्रही लोक प्रत्येक कालखंडात आपल्या अपूर्ण ज्ञान, अर्धवट विचार व अपरिपक्व संकल्पनांच्या आधारावर अगणित विचारधारा, संप्रदाय व जीवनदर्शन निर्माण करून ते लोकांसमोर सादर करीत असत. म्हणूनच मानवाद्वारे निराधार व अपूर्ण विचारधारा आणि जीवनव्यवस्थांचे खंडन करून योग्य व अनुकूल मार्ग दाखविणे अनिवार्य होते.

''आणि अल्लाहसाठी आवश्यक आहे सरळमार्ग दाखविणे जेव्हा की वाकडे मार्गदेखील अस्तित्वात आहेत.'' (दिव्य कुरआन, १६:९)

सर्वशक्तिमान अल्लाहने आपला संदेश व मार्गदर्शन केवळ एकाच माध्यमाद्वारे पाठविले आहे आणि ते माध्यम आहे ईशदूतत्व (पैगंबरत्व) त्याने प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक राष्ट्र आणि प्रत्येक लोकसमूहातील चांगल्या व सत्कर्म करणाऱ्या लोकांमधून आपला पैगंबर निवडला आणि त्यांच्यावर त्या लोकांचे मार्गदर्शन व सुधारणेचे दायित्व सोपविले. अल्लाहने याच पैगंबरावर संपूर्ण मानवजातीसाठी सत्यज्ञान व मार्गदर्शन असलेले पवित्र ग्रंथ अवतरित केले. पैगंबरांनी हे पवित्र ग्रंथ लोकांना वाचून ऐकवावेत, सत्यज्ञान व मार्गदर्शन म्हणजे काय हे समजावून सांगावे, सत्यज्ञान लपवून न ठेवता लोकांना द्यावे आणि प्रत्येक ठिकाणी त्यांचा प्रचार-प्रसार करावा आणि सर्व मानवांपर्यंत ते पोहोचविण्याची जबाबदारीदेखील अल्लाहने त्यांच्यावर सोपविली. पैगंबरांनी स्वत: त्या सत्यज्ञान व मार्गदर्शनाचे अनुसरण करावे, त्या ज्ञानानुसार आपले जीवन व्यतीत करावे, इतकेच नव्हे तर संपूर्ण मानवजातीलादेखील त्यानुसार जीवन व्यतीत करण्यासाठी प्रेरित करावे,

''प्रत्येक समुदायात एक पैगंबर पाठविण्यात आला आहे.''

(दिव्य कुरआन, १०:४७)

''आणि त्यांच्यासोबत ग्रंथ पाठविले त्यांच्यामध्ये निर्णय करण्यासाठी ज्यामध्ये ते मतभेद करीत होते.'' (दिव्य कुरआन, २:२१३)

आदरणीय मुहम्मद (स.) अल्लाहचे अंतिम पैगंबर आहेत. त्यांच्याद्वारे अल्लाहने आपला अंतिम पवित्र ग्रंथ 'कुरआन' अवतरित केला.

''मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत.'' (दिव्य कुरआन, ४८:२९)

''हे मुहम्मद! सांगा, हे मानवांनो, मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा पैगंबर आहे जो पृथ्वी व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे.'' (दिव्य कुरआन, ७:१५८)

''आणि अनुसरण करा त्याचे, जेणेकरून तुम्ही सरळमार्ग प्राप्त कराल.''

(दिव्य कुरआन, ७:१५८)

अल्लाहचे अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) संपूर्ण मानवजातीकरिता आणि अंतिम प्रलयाच्या दिवसापर्यंत पैगंबर बनवून पाठविण्यात आले आहेत,

''आम्ही तर तुम्हाला जगवासीयांसाठी कृपा बनवून पाठविले आहे.''

(दिव्य कुरआन, २१:१०७)

''आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी शुभवार्ता देणारा आणि सावध

करणारा बनवून पाठविले आहे.''   (दिव्य कुरआन, ३४:२८)

''ज्याने पैगंबरांची आज्ञा पाळली त्याने खरे म्हणजे अल्लाहचे आज्ञापालन केले.''

(दिव्य कुरआन, ४:८०)

म्हणूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आदेशांचे पालन करणे, खरे तर अल्लाहच्या आदेशांचेच पालन करणे आहे. त्यामुळे मानवाने अंतिम ईशदूत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वावर विश्वास ठेवावा, त्यांचा आदर सन्मान करावा, त्यांना मानवतेकरिता अल्लाहचे अंतिम पैगंबर मानावे आणि त्याचबरोबर त्यांना एकमेव मार्गदर्शक व सावध करणारा मानावे, हे अल्लाहने सर्व मानवांकरिता अनिवार्य ठरविले आहे. अल्लाहने स्वत: आपली सर्वोत्तम कृती मानवांना असे करण्याचा आदेश दिला आहे,

''(हे मुहम्मद !) आम्ही तुम्हाला लोकांसाठी पैगंबर बनवून पाठविले आहे आणि यासाठी अल्लाहची साक्ष पुरेशी आहे. ज्याने पैगंबरांची आज्ञा पाळली त्याने खरे म्हणजे अल्लाहचे आज्ञापालन केले.''   (दिव्य कुरआन, ४:७९-८०)

''(हे पैगंबर !) लोकांना सांगून टाका, 'जर तुम्ही खरोखर अल्लाहवर प्रेम करीत असाल, तर माझे अनुकरण करा, अल्लाह तुमच्यावर प्रेम करील आणि तुमच्या अपराधांना क्षमा करील. तो अत्यंत क्षमाशील व परम कृपाळू आहे.' त्यांना सांगा, 'अल्लाह व पैगंबरांचे आज्ञाधारक बना.' मग जर त्यांनी तुमचे आवाहन स्वीकारले नाही तर अल्लाह अवज्ञा करणाऱ्यांवर प्रेम करत नाही.''   (दिव्य कुरआन, ३:३१-३२)

पैगंबरत्व व ईशदूतत्वाच्या क्रमाचा आरंभ संपूर्ण मानवजातीचे पिता (प्रथम मानव) आदरणीय आदम (अ.) यांच्यापासूनच झाला होता आणि आदरणीय मुहम्मद (स.) यांच्यावर हा क्रम समाप्त झाला. अशा प्रकारे अल्लाहद्वारा पाठविण्यात येणाऱ्या सत्यधर्म इस्लामला आदरणीय मुहम्मद (स.) द्वारापूर्ण करण्यात आले आणि याबरोबरच अल्लहची सर्वोत्तम भेट, कृपा, दयाळूपणा, वरदान व कृपादेखील पूर्ण झाल्या. अल्लाह स्वत: या सत्यधर्माचे निरंतर रक्षण करील, अशी त्याने घोषणादेखील केली आहे. त्यामुळे आता अंतिम प्रलयाच्या दिवसापर्यंत कोणा अन्य पैगंबराच्या येण्याची अजिबात आवश्यकता नाही.

''परंतु ते (मुहम्मद (स.)) अल्लाहचे पैगंबर आणि अंतिम पैगंबर आहेत आणि अल्लाह प्रत्येक वस्तूचे ज्ञान बाळगणारा आहे.''   (दिव्य कुरआन, ३३:४०)

''आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हावर परिपूर्ण केली आहे आणि तुमच्यासाठी इस्लाम तुमचा धर्म म्हणून संमत केला आहे.''   (दिव्य कुरआन, ५:३)

''निश्चितच हे आम्ही अवतरले आले आणि आम्ही स्वत: याचे संरक्षक आहोत.''   (दिव्य कुरआन, १५:९)

अल्लाहने आपला अंतिम ग्रंथ 'पवित्र कुरआन' आपल्या अंतिम पैगंबर आदरणीय पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित केला आणि पवित्र कुरआनचे संदेश लोकांपर्यंत पोहचविण्याची, त्यानुसार जीवन व्यतीत करण्याचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी

त्यांच्यावर सोपविली. कुरआनची शिकवण व मार्गदर्शनास आपल्या जीवनाचे आदर्श बनविण्याचे ते आपल्या जीवनात उतरविण्याचे आणि त्यानुसार जीवन व्यतीत करून जगासमोर एक आदर्श सादर करण्याचे म्हणजेच सत्कर्म करून सद्‌वर्तनी मनुष्य बनण्याचे आवाहन अल्लाहने श्रद्धावंतांना केले आहे,

"पूर्वीच्या पैगंबरांनादेखील आम्ही उज्ज्वल संकेत व ग्रंथ देऊन पाठविले होते आणि आता हे पुन:स्मरण तुमच्यावर अवतरले आहे की जेणेकरून तुम्ही लोकांसमोर त्या शिक्षणाचे स्पष्टीकरण करीत राहावे जे त्यांच्यासाठी अवतरले गेले आहे, आणि जेणेकरून लोक (स्वत:देखील) गांभीर्याने विचार करतील." (दिव्य कुरआन, १६:४४)

"वस्तुत: तुम्हा लोकांसाठी अल्लाहचे पैगंबर एक उत्कृष्ट आदर्श आहे त्या प्रत्येक माणसासाठी जो अल्लाह व पारलौकिक जीवनाच्या दिवसाचा उमेदवार असेल आणि बहुतांशी अल्लाहचे स्मरण करीत असेल." (दिव्य कुरआन, ३३:२१)

म्हणूनच पैगंबर मुहम्मद (स.) यांचा सत्यशील अनुयायी बनण्यासाठी त्यांच्यावर अवतरित करण्यात आलेल्या पवित्र कुरआनवर दृढ श्रद्धा ठेवण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

"तर श्रद्धा ठेवा अल्लाहवर आणि त्याच्या पैगंबरावर आणि त्या प्रकाशावर जो आम्ही अवतरला आहे. जे काही तुम्ही करता अल्लाह त्याची खबर राखणारा आहे."

(दिव्य कुरआन, ६४:८)

लोक आणि परलोक दोन्ही ठिकाणी अल्लाहने मानवजातीच्या सफलता व भलाईकरिता पवित्र ग्रंथ कुरआन अवतरित केला, ही त्याच्याकडून फार मोठी भेट, त्याची असीम कृपा व दयाळूपणा आहे. पवित्र कुरआन मानवासाठी त्यांचा चांगुलपणा व यशस्वीतेसाठी अल्लाहद्वारा देण्यात आलेले सर्वांत मोठी कृपा व वरदान, सौभाग्य आणि शुभसूचना आहे. पवित्र कुरआन सर्व प्रकारचे ज्ञान, मार्गदर्शन, चेतावनी आणि प्रबोधनाचे अनोखे व अद्वितीय भंडार आहे. सर्व प्रकारचे ज्ञान व मार्गदर्शन असलेला दिव्य ग्रंथ आहे. मानवास जीवनाचा सत्यमार्ग सांगणारा आणि त्यानुसार जीवन व्यतीत करण्यास प्रेरित करणारा व प्रशिक्षण देणारा आणि त्यानुसार मार्गक्रमण करविणार एकमात्र ईशग्रंथ आहे. इतकेच नव्हे तर, वाईट विचारांपासून, अज्ञानापासून, पापकर्मांपासून परावृत्त करतो व वाचवितो. यात तथ्यांचे उत्तम प्रकारे, सुस्पष्ट व निर्णायक स्वरुपात वर्णन करण्यात आले आहे. थोडक्यात, हा ग्रंथ संपूर्ण मानवजातीसाठी अवतरित करण्यात आला आहे. हा ग्रंथ जीवनाशी संबंधित घटना व वस्तूंचे वर्णन करतो आणि यात देण्यात आलेले ज्ञान पूर्ण निष्ठेने प्राप्त करणाऱ्या, त्यापासून मार्गदर्शन मिळविणाऱ्या व त्यानुसार आपले जीवन व्यतीत करणाऱ्या लोकांसाठी हा एक अमूल्य उपहार, कृपा, वरदान आणि जीवनास यशस्वी करण्याचे सर्वोत्तम साधन आहे.

"लोकहो, आम्ही तुमच्याकडे असा एक ग्रंथ पाठविला आहे ज्यामध्ये तुमचाच उल्लेख आहे. तुम्हाला कळत नाही काय?" (दिव्य कुरआन, २१:१०)

"हे ग्रंथधारकांनो! आमचा पैगंबर तुमच्यापाशी आला आहे जो ईशग्रंथातील

पुष्कळशा त्या गोष्टी तुमच्यासमोर स्पष्ट करीत आहे. ज्यावर तुम्ही पडदा टाकीत आहात आणि तुमच्या कित्येक गोष्टी माफही करतो. तुमच्यापाशी अल्लाहकडून प्रकाश आणि एक असा सत्यदर्शी ग्रंथ आला आहे, ज्याच्याद्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या लोकांना जे त्याच्या प्रसन्नतेचे इच्छुक आहेत, शांती व सुरक्षिततेच्या पद्धती दाखवितो आणि आपल्या आदेशाने त्यांना अंधारातून बाहेर काढून प्रकाशाकडे आणतो आणि सरळ मार्गाकडे त्यांचे मार्गदर्शन करतो.'' (दिव्य कुरआन, ५:१५-१६)

''लोकहो तुमच्यापाशी तुमच्या पालनकर्त्याकडून उपदेश आलेला आहे, ही ती गोष्ट आहे जी अंत:करणात जो विकार आहे त्यावर उपाय आहे आणि जे कोणी याचा स्वीकार करतील त्यांच्याकरिता मार्गदर्शन आणि कृपा आहे. हे पैगंबर! सांगा की, ही अल्लाहची कृपा व त्याची मेहेरबानी आहे की ही गोष्ट त्याने पाठविली यावर तर लोकांनी आनंद व्यक्त केला पाहिजे. हे त्या सर्व वस्तूंपेक्षा उत्तम आहे, ज्यांना लोक गोळा करीत आहेत.'' (दिव्य कुरआन, १०:५७-५८)

''वस्तुस्थिती अशी आहे की हा कुरआन तो मार्ग दाखवितो जो अगदी सरळ आहे. जे लोक याला मान्य करून भली कृत्ये करू लागतील. त्यांना हा शुभवार्ता देतो की त्यांच्यासाठी मोठा मोबदला आहे आणि जे लोक पारलौकिक जीवनाला मानत नसतील त्यांना ही वार्ता देतो की त्यांच्यासाठी आम्ही दु:खदायक शिक्षा तयार ठेवली आहे.''

(दिव्य कुरआन, १७:९-१०)

''आणि आम्ही तुमच्यावर हा ग्रंथ उतरविला आहे जो प्रत्येक गोष्टीचा अगदी स्पष्टपणे खुलासा करणारा आहे आणि मार्गदर्शन, कृपा आणि खुशखबरी आहे त्या लोकांकरिता ज्यांनी आज्ञापालनार्थ मान तुकविली आहे.'' (दिव्य कुरआन, १६:८९)

''लोकहो ! जे काही तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर अवतरले गेले आहे त्याचे अनुसरण करा आणि आपल्या पालनकर्त्याला सोडून अन्य कोणाचे अनुकरण करू नका.'' (दिव्य कुरआन, ७:३)

''लोकहो! स्वत:ला वाचवा, आपल्या पालनकर्त्याच्या कोपापासून आणि भीती बाळगा त्या दिवसाची जेव्हा कोणताही पिता आपल्या पुत्रातर्फे बदला देणार नाही आणि कोणता पुत्रसुद्धा आपल्या पित्यातर्फे कोणताही बदला देणार नाही. खरोखर अल्लाहचे वचन सत्य आहे, म्हणून या लौकिक जीवनाचे तुम्हाला फसवू नये आणि धोकेबाजांनीसुद्धा तुम्हाला अल्लाहच्या बाबतीत फसवू नये.'' (दिव्य कुरआन, ३१:३३)

या सर्व सत्य गोष्टी स्वीकार करणारे, मग आपल्या जीवनात त्याचे अनुसरण करणारे, त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालणारे, त्यास आपल्या जीवनाचे एकमेव लक्ष्य, उद्देश व आदर्श मानणारे तसेच संपूर्ण निष्ठेने या सत्य गोष्टी दृढतेने सर्व मानवांपर्यंत पोहचविण्यात आणि त्यांच्या प्रचार-प्रसाराकरिता आपले सर्वस्व अर्पण करणारे लोक खरोखरच अभिनंदनास पात्र आहेत. या सर्व सत्य गोष्टींचा पाया म्हणजेच 'कलिमा शहादत' होय.

—०— समाप्त —०—